





# कथासरित्सागर

## स्वाभिमानी गुणशर्मा

प्र. शं. जोशी

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बालवाङ्मय
ग्रा. क्रं. ६२८८
IRBK-0106288
IRBK-0106288

# स्वाभिमानी गुणशर्मा

२२४८८
वा.वा.६.४५
८०७
३.१.१९६५

प्र. शं. जोशी

६२८८
म. प्रं. सं. ग्रंथालय शाखा.
वा. क्र. ६२८८ मो दि
वि. वा.वा.
IRBK-0106288

नये पैसे

* * * * * * * * * * * * *

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड,
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २

प्रकाशक :

एम्. के. वोरा
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत चाळीस नये पैसे
पहिली आवृत्ति : १९५७
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :

जयंत श्रीधर टिळक,
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ, पुणें २

# प्रकाशकाचें निवेदन

व्यास व वाल्मीकि हे महाकवि आपल्या परिचयाचे आहेत. पण त्यांच्याच तोडीचा महाकवि गुणाढ्य मात्र अनेकांना माहीतहि नसतो. कालिदास, बाण, सुबंधु इत्यादि संस्कृत कवींनीं गुणाढ्याच्या 'बृहत्कथे'चा मोठा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. गोवर्धन कवीनें तर गुणाढ्याला महर्षि व्यासांचा अवतारच मानिलें आहे. गुणाढ्यानें 'बृहत्कथा' नांवाचें आपलें महाकाव्य 'पैशाची' नांवाच्या प्राकृत भाषेंत लिहिलें. पण तें इतकें लोकप्रिय झालें कीं, 'बृहत्कथामंजरी', 'कथासरित्सागर', 'बृहत्कथासंग्रह' इत्यादि अनेक संस्कृत ग्रंथ त्यावरून रचले गेले. 'बृहत्कथा' हा ग्रंथ बाराव्या शतकापर्यंत उपलब्ध होता असें अनुमान विद्वानांनीं काढलें आहे. पण त्यानंतर मात्र या महाकाव्याला दुर्दैवानें आपण पारखे झालों. गुणाढ्या-संबंधींहि विश्वसनीय ऐतिहासिक माहिती आपणांस मिळत नाहीं.

'संस्कृत साहित्य सरिता' हा प्रकाशन-संच आम्हीं गतवर्षी प्रसिद्ध केला त्यांत सर्व प्रसिद्ध संस्कृत ललित वाङ्मय संक्षिप्त कथारूपानें दिलें आहे. या आमच्या प्रकाशनाचें सर्वत्र अत्यंत उत्साहानें स्वागत झालें. भारताचें सांस्कृतिक वाङ्मयीन धन मराठी मायबोलींतून सर्वसामान्य मराठी वाचकवर्गाच्या हातीं, अल्पमूल्यांत देण्याच्या या उपक्रमाबद्दल आमच्यावर धन्यवाद-अभिनंदनांचा खरोखरी वर्षाव झाला. याबद्दल आम्ही सर्वांचे ऋणी आहांत.

याच दृष्टीनें हें पुढलें पाऊल आम्हीं टाकलें आहे. 'संस्कृत साहित्य सरितें'त आम्हीं अनेक लेखकांचें सहकार्य घेतलें होतें. 'कथासरित्सागरा'चीं हीं दहाहि पुस्तकें मात्र श्री. प्र. शं. जोशी, एम्. ए., बी. टी., काव्यतीर्थ, व्याकरणविशारद यांनीं एकट्यांनींच अनुवादित व संकलित केलेलीं आहेत.

# कथानकाची भूमिका

मद्रदेशांत 'चंद्रप्रभ' नांवाचा एक विख्यात राजा होऊन गेला. त्याला 'सूर्यप्रभ' नांवाचा एक सुलक्षणी मुलगा होता. तो मानव असूनहि आपल्या चिकाटीनें विद्याधरांचा चक्रवर्ती बनला. सूर्यप्रभ एकदां युद्धाची तयारी करून, आपल्या महालांत वीतभीति नांवाच्या मंत्र्यासह रात्रीच्या वेळीं पुढील बेत रचीत अंथरुणावर पडला होता. पण त्याला कांहीं केल्या झोंप येण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां तो वीतभीतीला म्हणाला, " मित्रा ! झोंपायचें म्हटलें तरी झोंप येत नाहीं. तेव्हां एखादी मनोरंजक गोष्ट सांग. " नंतर वीतभीतीनें त्याला 'गुणशर्म्या'ची ही गोष्ट सांगितली.

कथासरित्सागराच्या आठव्या लंबकांतील सहाव्या तरंगांत ही गोष्ट आली आहे. आईवडिलांच्या सुखासाठीं यक्षभूमींतील ऐश्वर्यावर लाथ मारून आनंदानें मृत्युलोकांत आलेल्या एका पितृभक्त विद्याधराची ही कहाणी आहे. यांत खुनशी व पाताळयंत्री राणीच्या नादीं लागून स्वामिभक्त गुणशर्म्याला शिक्षा करूं पहाणाऱ्या महासेन राजाची अवस्था शेवटीं कशी अनुकंपनीय झाली हें पहाण्यासारखें आहे. गुणशर्म्याच्या जन्माचें रहस्य प्रारंभीं कळत नसल्यामुळें त्याच्या कृतींतील अद्भुतरम्यता वाचकांना थक्क करून सोडते. रसपरिपोषासाठीं याहि कथेंत कांहीं ठिकाणीं मूळ कथानकापेक्षां थोडा फेरबदल केला आहे.

# स्वाभिमानी गुणशर्मा

## उज्जयिनीचा राजा महासेन

पूर्वी भरतखंडांत उज्जयिनी हें शहर एक मोठी राजधानी म्हणून प्रसिद्धीस आलें होतें. महासेन नांवाचा एक राजा त्या नगरींत राज्य करीत होता. तो अनेक विद्यांचा चाहता व कलांचा भोक्ता होता. कितीतरी पंडितांना व कलाकारांना त्यानें आपल्या दरबारांत उदार आश्रय दिला होता. राणी अश्वकवतीहि अनेक कलांत प्रवीण असून महासेनाबरोबर विविध कलांचा आस्वाद अत्यंत तन्मयतेनें घेत असे. ती अत्यंत रूपवती असल्यामुळें राजाची ती सर्वांत लाडकी राणी झाली होती. राजाहि आपला बराच काळ तिच्याच सहवासांत घालवीत असे. तिचा एकहि शब्द तो खालीं पडूं देत नसे. त्यामुळें साहजिकच तिला आपल्या सौंदर्याचा गर्व वाटत होता. राजानें तिला अवास्तव मोठेपणा दिल्यामुळें तिचा स्वभाव मात्र कांहींसा हेकेखोर व खुनशी बनला होता.

• • •

## गुणशर्म्याचें आगमन

महासेनाच्या गुणग्राही स्वभावाची कीर्ति ऐकून गुणशर्मा नांवाचा एक अत्यंत तेजस्वी व सुंदर तरुण त्याच्या दरबारांत आला. त्यानें सर्व वेदशास्त्रांचें अध्ययन केलें होतें. नृत्यगीतादि कलांमध्यें तर तो लहानपणापासूनच निष्णात होता. धनुर्विद्येमध्येंहि त्याचा हात धरणारा कोणीहि शूर योद्धा नव्हता. त्याशिवाय कांहीं अद्भुत मंत्रहि त्याला चांगले अवगत होते. त्याचें सौंदर्यहि मदनाला लाजविणारें होतें. या सर्व गोष्टींमुळें 'हा कोणी देवदूत तर आला नसेल ना' अशी शंका कोणालाहि येई. महासेन राजानें मोठ्या सन्मानपूर्वक त्याला आपल्या दरबारीं ठेवून घेतलें. आपल्या

गुणांमुळें तो लवकरच राजाचा जिवलग मित्रहि झाला. आपल्या या नवीन मित्राचें कौतुक राजा अश्वकवतीसमोर मोठ्या अभिमानानें करीत असे. त्यामुळें राणीलाहि त्याच्याबद्दल बरीच उत्सुकता लागून राहिली होती. राजानें राणीशीं त्याचा खास परिचय करून दिला. नंतर गुणशर्म्याला राजवाड्यांत कोठेंहि प्रवेश मिळूं लागला.

• • •

## गुणशर्म्याची परीक्षा व त्याला मंत्रिपदाची प्राप्ति

एकदां राजा महासेन अश्वकवतीसह गप्पागोष्टी करीत बसला असता गुणशर्मा अचानक तेथें आला. त्यानेंहि त्यांच्या गप्पांत भाग घेतला. बोलतांबोलतां नृत्यकलेचा विषय निघाला. तेव्हां राजाच्या दरबारांत प्रसिद्ध असलेल्या नर्तक व नर्तिकांच्या नृत्यांतील दोष गुणशर्म्यानें स्पष्ट करून दाखविले. तेव्हां राजा चेष्टेनें म्हणाला, " मित्रा ! तूं यांच्या नृत्यांतील दोष दाखविलेस. तेव्हां निर्दोष नृत्य तरी कसें असतें तें आम्हांला तूंच दाखव." राजाचें हें चेष्टेचें बोलणें ऐकून गुणशर्मा हंसत हंसत म्हणाला, " महाराज ! निर्दोष नृत्य मीं निश्चित करून दाखवीन; पण माझ्यासारख्यानें नृत्य करायला प्रवृत्त होणें ही गोष्टच मुळीं हास्यास्पद आहे. त्यांत पुनः आपण व महाराणी यांच्यापुढें नृत्य करायचें या विचारानें मला मोठें संकोचल्यासारखें होतें." पण राणीला त्याचें नृत्य पहाण्याची तीव्र इच्छा झाली. तिनें राजाकरवीं त्याला खूप आग्रह केला. राजाहि त्याला म्हणाला, " मित्रा ! खासगी बैठकींत आपणांमध्यें राजा आणि सेवक हें नातें मुळींच उरलें नाहीं. तेव्हां तुला संकोच वाटायचें कांहीं कारण नाहीं. अशा प्रसंगीं आपल्या अंगची कला प्रकट करायची नाहीं तर ती करायची तरी केव्हां ? तेव्हां ऊठ. कर पाहूं नृत्याला सुरुवात !" राजाचे ते आग्रहाचे शब्द ऐकून गुणशर्मा विनवणीच्या स्वरांत म्हणाला, " महाराज ! कृपा करा व मला ही गोष्ट करायला लावूं नका.

मी आपल्यापुढें नृत्य केल्याचें लोकांना समजलें तर त्यांच्यांत तोंड वर काढायला मला जागा उरणार नाहीं. हवे तर मी कांहीं शिष्य तयार करतों व त्यांच्याकडून आपणास निर्दोष नृत्य दाखवितों." तें त्याचें म्हणणें ऐकून राजानें आपलें शेवटचें अस्त्र काढलें. तो म्हणाला, "नाहीं ना तूं आपली कला आम्हांला दाखविणार ? ठीक आहे ! तुझी मर्जी ! पण तुझें नृत्य पाहिल्याशिवाय मी अन्नाला स्पर्श करणार नाहीं, अशी माझी प्रतिज्ञा आहे."

राजाचा हा निश्चय पाहून त्याला पुनः नकार देणें गुणशर्म्याला शक्य नव्हतें. त्याचा नाइलाज झाला. तो उठला. राणीनें दासीकडून आणविलेले घुंगुर त्यानें पायांत बांधले व नृत्यास सुरुवात केली. लयबद्ध पदन्यासांनीं, चेहऱ्यावरील अर्थपूर्ण भावांनीं व वेताप्रमाणें लवणाऱ्या शरीर-यष्टीनें त्याचें नृत्य बहारीचें झालें. राजा व राणी यांनीं आयुष्यांत प्रथमच असें अलौकिक नृत्य पाहिलें. नृत्य संपवून तो राजाकडे आला असतां राजानें त्याला त्याच्या नैपुण्याबद्दल शाबासकी दिली.

मग तंतुवाद्यांतील त्याच्या कौशल्याची परीक्षा घेण्याच्या हेतूनें राजा त्याला म्हणाला, "मित्रा ! तुझें नृत्य खरोखरीच अप्रतिम झालें. पण तुझ्या हातचें वीणावादन ऐकण्याची माझी फार इच्छा आहे." जवळच असलेली एक वीणा उचलून गुणशर्म्याच्या हातीं देत राजा म्हणाला, "ही घे वीणा आणि एखादी उत्तम चीज यावर वाजवून दाखीव." बऱ्याच काळानंतर नृत्याचा आनंद लाभल्यानें गुणशर्माहि अगदीं खुषींत होता. त्यानें लीलेनें ती वीणा आपल्या हातीं घेतली व तिच्या तारांवरून आपलीं लांबसडक बोटें हळुवार फिरविलीं. तोंच तिच्यांतून मधुर स्वरांची बरसात होऊं लागली. वीणावादनांतील त्याची सहजता पाहून राजाचें आश्चर्य द्विगुणित झालें. राणी तर आश्चर्यानें थक्कच होऊन गेली. गुणशर्मा मात्र वीणेंतून निघालेले स्वर ऐकून कांहींसा अस्वस्थ झाला. क्षणभर थांबून पुनः एकदा

त्यानें वीणेच्या तारा छेडल्या व कान लावून त्यानें वीणेचे स्वर ऐकले. नंतर ती वीणा राजाच्या हातीं देत तो म्हणाला, " महाराज ! ही वीणा अपवित्र आहे. या वीणेच्या आंतील भागांत कुत्र्याच्या शेपटीचा उपयोग केला आहे, ही गोष्ट हिच्या तारांच्या स्वरांवरून स्पष्ट कळून येते. तेव्हां मला दुसरी वीणा द्या." राजाचा त्याच्या म्हणण्यावर विश्वासच बसेना. खात्री करून घेण्यासाठीं राजानें आपल्या कलाकारांकडून वीणा खोलून पाहिली. तों खरोखरीच आंतल्या बाजूस कुत्र्याच्या शेपटीचा वापर केल्याचें त्याला आढळून आलें. त्याच्या सर्वज्ञतेचें कौतुक करीत राजानें त्याला दुसरी वीणा दिली. नंतर गुणशर्म्यानें वीणेच्या मधुर स्वरांनीं राजा व राणी यांचीं मनें भारून टाकलीं. त्याचें वीणावादन संपल्यावर दोघांची समाधि उतरली.

आतां राजाला गुणशर्म्याची अस्त्रविद्येतील परीक्षा घ्यायची लहर आली. अस्त्रविद्या तर गुणशर्म्याचा आवडता विषय. 'डोळे बांधूनहि आपण लक्ष्याचा भेद करूं' असें त्यानें म्हणतांच, आपल्या-समोरच्या भिंतीवरील चित्राकडे बोट दाखवून राजा म्हणाला "तो पहा, समोरच्या चित्रांत एक छोटा पक्षी एका झाडाच्या फांदीवर बसलेला दिसतो. असेल तुझें कौशल्य, तर डोळे बांधून त्या पक्ष्याचा डोळा फोडून दाखव." राजाचें आव्हान त्यानें स्वीकारलें. सुई-सारखा एक अत्यंत अणकुचीदार बाण त्यानें घेतला. त्या पक्ष्याकडे एकदां नीट निरखून पाहिलें. स्वतः राजानें त्याचे डोळे बांधल्यावर त्याला दुसऱ्या एका बाजूला नेऊन उभें केलें. पण तेवढ्यांतूनहि गुणशर्म्यानें नेम धरून बाण सोडला. सूं सूं करीत गेलेल्या त्या बाणानें चित्रांतील त्या पक्ष्याचा फक्त डोळा तेवढा फोडला व तो बाण भिंतींत घुसला. तें पाहून मात्र 'हा कोणी तरी दैवी सामर्थ्याचा महापुरुष असला पाहिजे' अशी राजाची व राणीची खात्री झाली.

तरी पण त्याचें बाहुयुद्धांतील कौशल्य पहाण्याची राजाची इच्छा होतीच. बाहुयुद्धांत राजाचा हात धरणारा कोणी योद्धा नव्हता. राजानें त्याला युद्धाचें आव्हान दिलें. तेव्हां गुणशर्मा म्हणाला, " महाराज ! आपली इच्छा असेल तर मी बाहुयुद्धालाहि तयार आहें. बाहुयुद्धांत आपण तलवार घेऊन माझ्याशीं लढायला तयार व्हा. मी हातीं शस्त्र न घेतांच आपणाशीं युद्ध करतों. " त्यानें खूपच आग्रह केल्यावर राजा तलवार घेऊन गुणशर्म्यावर चालून गेला. राजाला हुलकावणी देत गुणशर्म्यानें त्याचे सर्व प्रहार चुकविले. आपले प्रहार वायां जात असलेले पाहून राजानें मोठ्या त्वेषानें त्याच्यावर वार केला. पण राजाला झुकांडी देऊन गुणशर्म्यानें मोठ्या चपळाईनें राजाची पाठ पकडली व पुनः प्रहारासाठीं राजानें हात उचलण्यापूर्वीच त्यानें राजाचा हात इतक्या जोरानें पिरगळला कीं राजाच्या हातांतून तलवार आपोआपच गळून पडली. नंतर दुसराहि हात मागें घेऊन त्यानें राजाचे दोन्ही हात बांधून टाकले व राजापुढें येऊन गुणशर्म्यानें त्याला नमस्कार केला. राजानें मोठ्या खेळीमेळीनें आपला पराभव कबूल केला व सर्व कला आणि विद्या यांच्यामध्यें अलौकिक कौशल्य असलेल्या त्याला राजानें आपला प्रधानमंत्री करण्याचा निश्चय केला.

• • •

## राणी अश्वकवतीची मनीषा

इकडे गुणशर्म्याच्या गुणांनीं मोहून गेलेल्या राणीच्या मनांत दुसरेंच विचार चालले होते. गुणशर्मा नेहमीं आपल्या तैनातीला असावा असें तिला वाटलें. पण राजाला ती तसें स्पष्ट सांगूं शकत नव्हती. शेवटीं गुणशर्म्याशीं आपला परिचय अधिकाधिक कसा होईल याबद्दल विचार करीत असतां तिला एक युक्ति सुचली व ती राजाला म्हणाली, " महाराज ! यांचें वीणावादन ऐकून, मला तें यांच्याकडून शिकण्याची फार इच्छा झाली

आहे. आपण यांना माझ्याकरितां तशी विनंति कराल अशी आशा आहे." राजानें आपल्या लाडक्या राणीची कोणतीहि विनंति पूर्वी अमान्य केली नव्हती. राणीची मनापासून इच्छा असलेली पाहून राजा गुणशर्म्याला म्हणाला, " मित्रा ! विद्या व कला यांतलि तुझ्या कौशल्याची आज आम्हांला ओळख झाली. आजपासून मी तुला मुख्य मंत्री करण्याचें ठरविलें आहे. पण देवी अश्वकवतीला तूं वीणावादन शिकवावेंस अशी माझी तुला विनंति आहे. तुझ्याकडून वीणा शिकण्याची तिची फार फार इच्छा आहे. तेव्हां मंत्रिपद मिळालें म्हणून ही कामगिरी करायला तुला संकोच वाटूं देऊं नको. मित्रकार्य म्हणून तूं या गोष्टीकडे पहा. "

राजानें मुख्यमंत्रिपद दिलेलें ऐकून गुणशर्म्याला अत्यंत आनंद झाला. पण राणीला शिकविणें हें त्याला कमीपणाचें वाटूं लागलें. पण राजाची विनंति अमान्य करणेंहि त्याच्या जिवावर आलें. कांहींसा विचार करून तो राजाला म्हणाला, " महाराज ! आपल्यामुळें मला मुख्य मंत्री होतां आलें याबद्दल मी आपला जन्माचा ऋणी आहें. महाराणींना शिकविण्यांत मला केव्हांहि आनंदच वाटेल. पण वीणावादनाची सुरुवात एखाद्या चांगल्या मुहूर्तावर करावी असें मला वाटतें. " राजालाहि त्याचा तो विचार पटला. अश्वकवतीचा मात्र थोडा विरस झाला. शेवटीं राजा व राणी यांचा निरोप घेऊन गुणशर्मा खुषींत घरीं आला.

● ● ●

## शिकण्याला मुहूर्त मिळेना !

राणीनें ज्योतिष्यांना बोलावून घेतलें व ' वीणावादनाला उत्तम मुहूर्त काढून द्या ' असें त्यांना सांगितलें. ज्योतिष्यांनीं बारकाईनें पंचांग पाहून मुहूर्त शोधला; पण ' नजीकच्या काळांत चांगला मुहूर्त नाहीं ' असें त्यांनीं सांगतांच अश्वकवतीचा उत्साह मावळला. तिला वीणावादनाच्या

मुहूर्ताची वाट पहात तब्बल महिनाभर स्वस्थ बसावें लागणार होतें. मनांतून ती फारच खट्टू झाली, गुणशर्म्याला मात्र आजचें मरण उद्यांवर ढकलल्याचें समाधान मिळालें.

ग्रंथालय

• • •

## महाराज महासेनावर विषप्रयोग

मुख्य मंत्री झाल्यावर अनेक जबाबदाऱ्या येऊन पडूं लागल्या. कांहीं कामांच्या बाबतींत सल्ला घेण्यासाठीं त्याला वेळींअवेळीं राजाकडे यावें लागे. एके दिवशीं तो असाच राजाकडे आला. सल्लामसलत चालली असतां राजाची जेवणाची वेळ झाली. वाढप्यांनीं वर्दी दिल्यावर गुणशर्म्याचेंहि पान वाढण्यास राजानें सांगितलें. राजा व मंत्री दोघेहि पानावर येऊन बसले. अश्वकवती आधींच आली होती. गप्पागोष्टी करीत जेवण चालू झालें. राजाचा खास स्वयंपाकी एक नवीन पदार्थ राजास वाढूं लागला. गुणशर्म्याचें तिकडे लक्ष गेलें व तो एकदम ओरडला, " अरे ! अरे ! काय वाढतोस हें तूं महाराजांना ? " तेव्हां तो स्वयंपाकी या प्रश्नानें गोंधळून गेला. तितक्यांत दारावर असलेल्या पहारेकऱ्याला बोलावून स्वयंपाक्याला पकडण्याची गुणशर्म्यानें आज्ञा केली. राजाला किंवा महाराणी अश्वकवतीलाहि तो काय प्रकार चालला आहे तें कळेना. राजानें विचारलें, तेव्हां गुणशर्मा म्हणाला, " महाराज ! या दुष्टानें वाढायला आणलेल्या या पदार्थांत विष कालविलें आहे. तें पहातांक्षणींच मला शंका आली व याच्या चेहेऱ्यावरील भीति व गोंधळ पाहून तर माझी खात्रीच पटली आहे. आपणाला या गोष्टीचा पडताळा पहायचा असेल तर आपण हा पदार्थ कोणालाहि खायला लावा. थोड्याच वेळांत त्याचें अंग विषानें काळें ठिक्कर पडलेलें दिसेल. "

नंतर सेवकांच्याकडे वळून तो म्हणाला, " तुमच्यापैकीं जर कोणी हा पदार्थ खाऊन महाराजांची खात्री पटवून द्यायला तयार असेल तर तुमच्या

अंगीं भिनलेलें विष मी उतरवीन व तुम्हांला मोठें इनाम देईन. " पण गुणशर्म्याचे हे शब्द ऐकून कोणीहि पुढें आला नाहीं. राजानें स्वयंपाक्याला विचारलें, तेव्हां तो म्हणाला, "महाराज, या पदार्थांत मुळींच विष नाहीं. प्रधानजींचा कांहीं तरी गैरसमज झालेला दिसतो." तें ऐकून गुणशर्म्यानें तो पदार्थ स्वयंपाक्यालाच खावयास लावला. स्वयंपाक्याचा नाइलाज झाला. इच्छा नसतांनाहि तो खाणें त्याला भाग पडलें. थोड्याच वेळांत त्याचा व्हायचा तो परिणाम झाला. स्वयंपाक्याला ग्लानी आली. तो मूर्च्छा येऊन पडला. त्याच्या तोंडाला फेंस येऊं लागला. सर्वांची खात्री पटली.

राजाला विष देण्याचा एखादा कट असला पाहिजे असें वाटून त्या कटाचे धागेदोरे हातीं यावेत म्हणून गुणशर्म्यानें स्वयंपाक्याचें विष मंत्र-सामर्थ्यानें उतरविलें व त्याची चौकशी सुरू केली. स्वयंपाक्याला आतां लपवाछपवी करणें शक्य नव्हतें. गुणशर्म्यानें विचारलें असतां राजाकडे वळून तो म्हणाला, "महाराज ! मी प्रथम खोटें बोलल्याबद्दल आपण मला क्षमा करावी. गौडदेशाचे महाराज विक्रमशक्ति यांचा मी सेवक आहें. आपल्यावर विषप्रयोग करण्याची कामगिरी त्यांनींच माझ्यावर सोंपविली. मला उत्तम स्वयंपाक करतां येत असल्यामुळें मला येथें आचाऱ्याची नोकरी मिळूं शकली. बरेच दिवस मी येथें काम करीत आहें. संधि साधून मी आज या पदार्थांत विष कालविलें व वाढायला आलों. महामंत्र्यांनीं ही गोष्ट कशी ओळखली देव जाणें. कारण माझ्याशिवाय ही गोष्ट कोणालाहि माहीत नाहीं. मी आपला सर्वस्वीं अपराधी आहे. आपण द्याल ती शिक्षा भोगण्यास मी तयार आहें." आचाऱ्याचे ते शब्द ऐकून सर्वांना आश्चर्य वाटलें व त्यांनीं गुणशर्म्याच्या बुद्धीचें कौतुक केलें. आपले प्राण वांचविणाऱ्या मित्राला राजानें एक हजार गांवें इनाम दिलीं व गुणशर्म्याच्या सांगण्यावरून त्या स्वयंपाक्याला सुळावर चढविण्याची आज्ञा दिली. त्या सर्व घटना पाहून अश्वकवती राणीला गुणशर्म्याबद्दल

अधिकच आदर वाटूं लागला व कांहीं काळ कां होईना, त्याला आपल्या तैनातीला ठेवून घेण्याची तिची इच्छा प्रबळ झाली.

• • •

## राणी अश्वकवतीनें टाकलेला पेंच

वीणावादनाला सुरुवात करायच्या दिवशीं गुणशर्म्यानें एक महत्त्वाचें काम काढलें व त्यानिमित्त तो दुसरीकडे गेला. राणी त्या दिवशीं मोठ्या उत्साहानें त्याची वाट पहात होती; पण तिच्या पदरीं निराशा आली. दुसरे दिवशीं तिनें गुणशर्म्याला बोलावून घेतलें व ती म्हणाली, "प्रधानजी! मला शिकविण्याची तुमची इच्छा दिसत नाहीं. नाहीं तर काल कामाचें निमित्त काढून तुम्ही राजधानीबाहेर गेलां नसतां. तें कांहीं चालायचें नाहीं. तुमचीं कितीहि महत्त्वाचीं कामें असलीं तरी बाजूला ठेवून तुम्हीं माझ्यासाठीं एक-दोन तास राखून ठेवलेच पाहिजेत." राणीच्या रागाचा पारा बराच चढलेला आहे हें पाहून गुणशर्मा समजावणीच्या स्वरांत म्हणाला, "राणीसाहेब! महाराजांनीं विनंति केल्यावरून मीं आपणांस वीणावादन शिकविण्याचें कबूल केलें होतें; पण राज्याच्या कामकाजामुळें मला थोडीहि सवड मिळणें कठीण दिसतें. तेव्हां आपण मला विशेष आग्रह करूं नये अशी माझी आपणांस विनंति आहे." गुणशर्म्याचे ते शब्द ऐकून राणी चिडून रागानें म्हणाली, "मंत्री! महाराणीची आज्ञा तुम्हांला प्रथम मान्य करावी लागेल; नाहीं तर त्याचा परिणाम कांहीं ठीक होणार नाहीं माझी आज्ञा मोडायचा विचार मनांत आणाल तर चोवीस तास माझ्या तैनातीला रहायची पाळी येईल."

राणीचे ते अपमानकारक शब्द ऐकून गुणशर्म्यालाहि राग आला. तो त्वेषानें म्हणाला, "मरण आलें तरी पत्करलें; पण यापुढें

आपल्या महालांत पायहि टाकणार नाहीं ! माझ्यावर हुकुमत गाजवूं इच्छिणाऱ्याला पश्चात्तापाची पाळी येईल हें नक्की समजा."

महाराणी अश्वकवतीला इतक्या स्पष्ट शब्दांत यापूर्वी कोणीच बोललें नव्हतें. गुणशर्म्याचें तें निर्भय व स्पष्ट बोलणें ऐकून अश्वकवतीचा राग अनावर झाला. ती इरेला पेटली होती. गुणशर्म्याला आपलें म्हणणें कबूल करायला लावण्याच्या निश्चयानें ती म्हणाली, " गुणशर्मन्, तूं आपली पायरी सोडून बोलूं लागला आहेस. माझी आज्ञा झुगारून द्यायचा तुझा विचार असेल तर आतांच आरडाओरडा करून तुझी बेअब्रू करणें मला कठीण नाहीं. तेव्हां माझ्या आज्ञेपुढें मान तरी तुकव, नाहीं तर स्वतःच्या अब्रूचे धिंडवडे काढून मरण्याला तरी तयार हो." राणीनें अशा रीतीनें आपल्यावर डाव उलटविलेला पाहून गुणशर्मा पेंचांत पडला. त्याला मरणाची भीति नव्हती; पण राणीनें भलतेच आरोप करून त्याची बेअब्रू केली असती तर त्याला मरणापेक्षां दुःख झालें असतें. आणि लोकांना त्यानें जीव तोडून सांगितलें असतें तरी कुणीहि राणीचेंच म्हणणें खरें मानलें असतें. तेव्हां पड खाऊन गुणशर्मा म्हणाला, " महाराणीसाहेब ! आपल्या आज्ञेबाहेर मी नाहीं. पण राजकार्यामुळें मला सवड मिळत नाहीं म्हणून माझा नाइलाज आहे. थोड्याच दिवसांत कामाची जबाबदारी कमी होईल, तेव्हां मी आपल्याला वीणावादन शिकविण्यास येईन." त्याचें तें आश्वासन ऐकून अश्वकवतीला ' आपण जिंकल्याचें ' समाधान झालें. तिचा निरोप घेऊन गुणशर्मा निघाला, तेव्हां त्यालाहि हायसें वाटलें. महालांतून बाहेर पडल्यावर त्या राज्याला कायमचा रामराम ठोकावा, असाहि विचार त्याच्या मनांत आला. पण महासेन राजावर आणखी कांहीं संकटें येणार आहेत अशी त्याची मनोदेवता त्याला सांगत होती. त्यासाठीं त्याला उज्जयिनींत रहाणें भाग होतें.

● ● ●

## महासेनावरील संकट व गुणशर्म्याची युक्ति

लवकरच त्याचें भविष्य खरें ठरूं लागलें. महासेन राजानें जेव्हां कोटदेशाचा राजा सोमकेश्वर याला शरण आणण्यासाठीं त्याच्या राजधानीला वेढा दिला, तेव्हां गौडदेशाच्या विक्रमशक्तीनें महासेनाच्या छावणीला अकल्पितपणें प्रचंड सैन्याचा वेढा दिला. तें अचानक आलेलें संकट पाहून महासेन कांहींसा गोंधळून गेला. गुणशर्म्याला बोलावून घेऊन तो म्हणाला, "प्रधानजी ! आम्हीं सोमकेश्वराला वेढा दिला आहे, तर विक्रमशक्तीनें आमच्या छावणीला वेढून टाकलें आहे. अशा वेळीं दोन शत्रूंशीं युद्ध करणें कसें शक्य आहे ? बरें, युद्ध न करावें, तर वेढ्यामध्यें किती दिवस अडकून पडायचें ? तेव्हां या प्रसंगीं काय धोरण आंखावें हेंच कळत नाहीं. तुम्हीच आतां मला कांहीं तरी मार्ग सुचवा." राजाचें हें बोलणें ऐकून गुणशर्म्यानें क्षणभर विचार केला व राजाला धीर देत तो म्हणाला, "महाराज ! आपण कसलीहि काळजी करूं नका. या संकटांतून पार पडण्याचा उपाय मी लवकरच योजतों. एकदोन दिवसांत युद्धाचा प्रसंग न उद्भवतांच विक्रमशक्ति आपणाला शरण येईल."

असें सांगून त्यानें राजाचा निरोप घेतला व तो थेट आपल्या तंबूंत आला. त्यानें सेनापतींची गांठ घेऊन त्यांना योग्य त्या सूचना देऊन ठेवल्या. रात्रीं त्यानें आपल्या डोळ्यांत एक दिव्य अंजन घातलें. त्याच क्षणीं तो अदृश्य झाला व कोणालाहि न दिसतां आपल्या सैन्याचा तळ ओलांडून त्यानें विक्रमशक्तीच्या छावणींत प्रवेश केला. दिवसभर झालेल्या दगदगीनें विक्रमशक्तीला गाढ झोंप लागली होती. गुणशर्मा अदृश्य रूपानेंच विक्रमशक्तीच्या तंबूंत आला व त्याला जागें करून म्हणाला, "राजन् ! भगवान विष्णूनें मला तुझ्याकडे पाठविलें आहे. त्याचा तूं लाडका भक्त असल्यामुळें तुझ्यावर संकट ओढवूं

नये असें त्याला वाटतें. म्हणून त्यानें तुला निरोप दिला आहे कीं, तूं महासेन राजाशीं लवकरच तह कर. नाहीं तर तुझी व तुझ्या सैन्याची कांहीं धडगत दिसत नाहीं. तूं आपण होऊन जर महासेनाकडे दूत पाठविलास तर तो पूर्वीचें वैर विसरून तुझ्याशीं तह करायला तयार होईल."

विक्रमशक्तीला हे शब्द अगदीं जवळून ऐकूं आले. कोण बोलत आहे हें पहाण्यासाठीं त्यानें तिकडे डोळे विस्फारून बघितलें; पण त्याला कोणीच दिसलें नाहीं. तो तंबूबाहेर आला. पहारेकरी पहारा करीत होते. त्यांना विक्रमशक्तीनें विचारलें, "आतां कोणी आंत येऊन गेलें काय ?" राजाचा हा प्रश्न ऐकून पहारेकऱ्यांना आश्चर्य वाटलें. त्यांचा खडा पहारा चालू होता. छावणींतहि कडेकोट बंदोबस्त होता. अशा वेळीं कोणीहि परका मनुष्य तिकडे फिरकणें शक्य नव्हतें. ते राजाला म्हणाले, "महाराज ! आमचा सतत जागता पहारा चालूच आहे. आपल्या तंबूंत शिरतांना किंवा त्यांतून बाहेर पडतांना आम्हांला कोणीहि दिसलें नाहीं." त्यांचे ते शब्द ऐकून राजास अधिकच आश्चर्य वाटलें. तो पुनः आपल्या बिछान्यावर आला. "आपल्याला संदेश देण्यासाठीं भगवान विष्णूनेंच देवदूत पाठविला असला पाहिजे" अशी त्याची खात्री झाली. विष्णूच्या सांगण्याप्रमाणें वागायचें असें त्यानें मनाशीं ठरविलें व तो आपल्याशींच म्हणाला, "भगवान् विष्णु ज्या अर्थी माझी काळजी घेतात त्या अर्थी आज मी धन्य झालों. त्यांच्या आदेशाप्रमाणें उद्यां सकाळींच महासेनाकडे दूत पाठवावा."

राजाची ही सर्व हालचाल अदृश्यपणानें वावरणाऱ्या गुणशर्म्यानें पाहिली व राजानें आपल्याशीं उच्चारलेले शब्दहि ऐकले. आपल्या छावणींत परत येऊन त्यानें विक्रमशक्तीला सर्व हकीकत सांगितली. तेव्हां गुणशर्म्याच्या कल्पकतेनें राजा चकितच झाला. आपणाला दुसऱ्यांदां संकटांतून वांचविणाऱ्या गुणशर्म्याबद्दल त्याला मोठा

आदर वाटूं लागला. ठरल्याप्रमाणें दुसरे दिवशीं सकाळीं विक्रमशक्तीचा दूत महासेनाकडे आला. महासेनानें तहाचीं बोलणीं करण्यासाठीं आपला अधिकारी विक्रमशक्तीकडे पाठविला. विक्रमशक्तीनें त्याच्यातर्फे महासेनाशीं तह केला व आपलें सर्व सैन्य घेऊन तो गौडदेशाला निघून गेला. आतां महासेनाचा मार्ग मोकळा झाला. सोमक राजावर त्यानें निकराचा हल्ला चढविला. महासेनाच्या हल्ल्यापुढें त्याचा निभाव लागणें शक्य नव्हतें. सोमकेश्वर त्याला शरण आला. त्यानें महासेनाला असंख्य हत्ती व घोडे खंडणी म्हणून दिले. नंतर त्या सर्व यशाचें श्रेय गुणशर्म्याला देत राजा महासेन सर्व सैन्यासह उज्जयिनीस परत आला.

• • •

## महासेन राजाची सर्पदंशांतून मुक्तता

उज्जयिनीमध्यें आनंदानें काळ घालवीत असतां, राजाला एकदा नदींत विहार करण्याची इच्छा झाली. आपल्या मित्रांना बरोबर घेऊन त्यानें एके दिवशीं संध्याकाळीं मनसोक्त जलविहार केला. नंतर तेथील एका उद्यानाची शोभा पहात पहात ते सर्वजण चालले असतां राजाला, ‘ आपल्या पायाला कांहींतरी चावल्यासारखें ’ वाटलें. म्हणून त्यानें खालीं पाहिलें तों त्या अंधुक प्रकाशांत एक मोठा साप सळसळ करीत अदृश्यहि झाला. सर्पदंशानंतरच्या वेदना राजाला असह्य होऊं लागल्या. राजानें इत-रांना ती गोष्ट सांगतांच काय करावें हेंच कोणाला सुचेना. सर्वजण गोंधळून गेले. इकडे विषाचा परिणाम राजावर होऊं लागला. तो मूर्च्छा येऊन पडला. हां, हां म्हणतां ही बातमी सगळीकडे पसरली. गुणशर्मा उद्यानाच्या दुसऱ्या एका भागांत होता. तो धांवतच तेथें आला व आपल्या मंत्रसामर्थ्यानें राजाच्या अंगीं भिनलेलें विष त्यानें उतरविलें. राजा शुद्धी-वर आलेला पाहून सर्वांना आनंद झाला. आपले प्राण वांचल्याबद्दल

राजानें नगरीमध्यें मोठा उत्सव केला व प्राणसंकटांतून वांचविणाऱ्या गुणशर्म्याचा त्यानें मोठ्या सन्मानानें सत्कार केला.

● ● ●

## विक्रमसेनावर स्वारी

गुणशर्म्यानें आश्वासन दिल्याप्रमाणें तो आपल्याला वीणा शिकविण्यासाठीं येईल, अशी आशा अश्वकवतीला वाटत होती. पण कांहींना कांहीं महत्त्वाचीं कामें निघायचीं व त्याला राणीकडे जाणें जमायचें नाहीं. तेव्हां तो हेतुपुरःसर आपल्याला टाळतो असें राणीला वाटलें. त्या बाबतींत तिनें चौकशी करायचें ठरविलें. त्याच सुमारास विक्रमशक्तीनें महासेनाची कांहीं कुरापत काढली. विक्रमशक्तीनें नुकताच तह केला असला तरी तो सापासारखा केव्हां उलटेल सांगतां येत नव्हतें. त्यामुळें त्याचा कायमचा कांटा काढण्याचें महासेनानें ठरविलें व विक्रमशक्तीनें काढलेल्या कुरापतीचें निमित्त पुढें करून महासेनानें मोठ्या सैन्यानिशीं विक्रमशक्तीवर चाल केली. विक्रमशक्तीनें आपले हेर सगळीकडे पेरून ठेवले होतेच. त्यांच्याकडून महासेनाच्या हल्ल्याची बातमी त्याला आधींच समजली. त्यामुळें तोहि जय्यत तयारी करून महासेनानें नगरीला वेढा देण्यापूर्वींच त्याच्या सैन्यावर चालून गेला. दोन्ही सैन्यें एकमेकांना भिडलीं. घनघोर युद्ध सुरू झालें. हजारों सैनिक धारातीर्थी पतन पावले. महासेन व विक्रमशक्ति दोघेहि रथांत बसून रणांगणांत चौफेर संचार करीत होते.

● ● ●

## प्राणावर बेतलें, पण थोडक्यांत निभावलें !

आपापल्या सैन्याला धीर देत, शत्रुसैन्यावर हल्ला चढवीत असतां दैवयोगानें दोघांचेहि रथ समोरासमोर आले. महासेनानें विक्रमशक्तीच्या सारथ्याला ठार केलें. तेव्हां स्वतः रथ हांकीत तो महासेनाशीं लढूं लागला. त्यांत त्यानें महासेनाच्या रथाचे घोडे निकामी करून टाकले. तें पाहून

महासेनानें शत्रूच्या रथाचें चाकच मोडून टाकलें. अशा तऱ्हेनें दोघांचेहि रथ निकामी झाल्यावर ते दोघेहि रथांतून खालीं उतरले व हातांत खड्ग घेऊन त्वेषानें एकमेकावर धांवून गेले. त्या घाईत, मरून पडलेल्या एका वीराला ठेंच लागल्यानें महासेन खालीं पडला. इतक्यांत जवळ आलेल्या विक्रमशक्तीनें त्या संधीचा फायदा घेऊन महासेनावर प्रहार करण्यासाठीं शस्त्र उगारलें. गुणशर्मा जवळ होताच; त्याच्या तें लक्षांत येतांच, त्यानें आपल्या बाणानें विक्रमशक्तीचा हात वरच्यावर तोडून टाकला. विक्रमशक्तीला या गोष्टीची कांहींच कल्पना नव्हती. तो इकडे-तिकडे पहातो, तोंच दुसरा एक बाण त्याच्या छातींत घुसला व तो धाडकन् खालीं कोसळला. उठतां उठतां महासेनानें तो सर्व प्रकार पाहिला होता. याहि प्राणसंकटाच्या वेळीं गुणशर्मा आपल्या मदतीला धांवून आलेला पाहून त्याचे कसे उपकार मानावेत हेंच त्याला कळेना. तो गुणशर्म्याजवळ येऊन म्हणाला, “प्रधानजी! तुम्हीं माझे प्राण अनेकदां वांचविले आहेत. आतां तुम्ही जवळ नसतां तर कांहीं माझी धडगत नव्हती. तुमच्या या उपकाराबद्दल मी तुमचा कायमचा ऋणी राहीन. तुम्हीं केलेल्या उपकारांची फेड कशी करावी हेंच मला कळत नाहीं.”

राजाचे कृतज्ञतेचे उद्गार ऐकून गुणशर्मा म्हणाला, “महाराज! आपण असें बोलूं नका. संकटांत आपल्याला साहाय्य करणें हें आमचें कर्तव्यच आहे. नाहीं तर आमचा काय उपयोग? आपण मला आपल्या भावाप्रमाणें वागवतां यांतच मी स्वतःला धन्य समजतों. मला दुसरी कसलीहि अपेक्षा नाहीं.” असें म्हणून त्यानें राजाचें लक्ष शत्रुसैन्याकडे वेधलें. विक्रमशक्ति जखमी होऊन पडला आहे हें समजतांच त्याच्या सैन्यांत गोंधळ माजला. प्रत्येकजण वाट फुटेल तिकडे पळत सुटला. तें पाहून शत्रूच्या सेनापतींनीं सैनिकांना आंवरण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ. शेवटीं विक्रमशक्तीचें सैन्य महासेनाला शरण आलें. विक्रमशक्तीला

मदत करण्यासाठीं आलेल्या राजांना महासेनानें कैद केलें व त्यांचेंहि राज्य जिंकून तो उज्जयिनीला परत आला. नंतर विजय मिळाल्याबद्दल त्यानें मोठा उत्सव केला.

• • •

## अश्वकवतीचें दुष्ट कारस्थान

इकडे गुणशर्म्यानें महाराणी अश्वकवतीची मागणी या ना त्या निमित्तानें लांबणीवर टाकल्यानें ती आतां त्याच्यावर चिडली होती. तिनें खुनशीपणानें त्याचा पुरेपूर सूड उगविण्याचा निश्चय केला. गुणशर्म्याबद्दल राजाचें मन कलुषित करण्याचा बेत तिनें रचला.

एके दिवशीं राजा तिच्या महालांत येण्याच्या वेळीं तिनें गळा काढून रडायला सुरुवात केली. सेवकांना तिच्या रडण्याचें कारण मुळींच समजलें नाहीं. तिला विचारायचा धीरहि कोणाला झाला नाहीं. त्यांतून एका धीट दासीनें पुढें येऊन विचारलें, तेव्हां राणीनें सर्व दासदासींना महालाबाहेर हांकलून दिलें. इतक्यांत राजा तेथें आला. आजचा रागरंग कांहीं वेगळाच होता. राजानें आंत येऊन पाहिलें तों एकहि दासी तेथें नव्हती. महाराणी अश्वकवती धाय मोकलून रडत होती. राजानें जवळ येऊन विचारलें, तेव्हां तर ती त्याच्यापुढें डोकें आपटून घेऊं लागली. राजानें तिचा हात धरून उठविलें. कोचावर आणून बसवीत त्यानें तिला विचारलें, " देवी ! अग, झालें तरी काय ? मी असतांना तुला दुःखाचें काय कारण ? जर कोणी तुझा अपराध किंवा अपमान केला असेल तर त्याचें नुसतें नांव सांग. त्याला याच क्षणीं जगांतून नाहींसा करतों. "

राजाचे हे शब्द ऐकून हुंदके आवरण्याचा प्रयत्न करीत राणी म्हणाली, " महाराज ! ज्यानें आपला अक्षम्य अपराध व माझा असह्य अपमान केला आहे त्याला आपण शिक्षा करूं शकणार नाहीं याची मला खात्री आहे. एवढेंच नव्हे तर मीं त्याचें नांव सांगितलें असतां,

ग. पं. ई. ठाणे, ...
ग्र. क्र. . क्रॉ. क्रि

आपणाला माझें म्हणणं खरेंहि वाटणार नाहीं. तेव्हां निष्कारण बोलून काय उपयोग ? अशा स्थितींत नशिबाला बोल लावून रडत बसण्यापेक्षां मी अधिक काय करूं शकणार ? " राणीचे ते दुःखपूर्ण उद्गार ऐकून ' अपराधी कोणीहि असला तरी त्याला शिक्षा करण्याचें वचन ' राजानें तिला दिलें. तेव्हां डोळ्यांतील अश्रु पुशीत राणी राजाला सांगूं लागली.

ती म्हणाली, " महाराज ! या गुणशर्म्याला तुम्हीं आपला जिवलग मित्र मानतां; पण त्या पाताळयंत्री दुष्टाचें अंतरंग तुम्हांला अजून कळलेलें नाहीं. आपण आजपर्यंत या सापाला दूध पाजलें; पण तो नीच आपल्यावर उलटण्यासाठीं टपून बसला आहे. त्याचा इतिहास ऐकाल तर तुमच्याहि अंगावर शहारे येतील. गौडदेशच्या विक्रमशक्ति राजानें त्याला पैसे देऊन तुमच्या दरबारांत पाठविलें. बराच काळपर्यंत त्याला विक्रमशक्तीकडून तनखा मिळत होता. त्याच्या गुणांवर खूष होऊन जेव्हां तुम्हीं त्याला आपला प्रधान मंत्री केलें, तेव्हां त्याचा तनखा बंद झाला. मग त्यानें विक्रमशक्तीकडे एक दूत पाठविला व निरोप कळविला कीं, " महाराज ! सोमदेवावर विषप्रयोग करण्याचा मीं एक कट रचला आहे. तो यशस्वी रीतीनें पार पाडण्यासाठीं आपणांकडून बऱ्याच संपत्तीची आवश्य-कता आहे." गुणशर्म्याचा सेवक विक्रमशक्तीला हा निरोप सांगत असतां राजाच्या विश्वासांतील एक आचारी तेथें होता. तो राजाला म्हणाला, " महाराज, विषप्रयोग करायला इतका पैसा कशाला हवा ? माझ्याकडे तें काम सोंपवा. मी त पैशाशिवाय करून दाखवितों." आचाऱ्याचें म्हणणें राजाला पटलें. आपला कट फुटेल म्हणून त्या आचाऱ्याच्या सांगण्यावरून विक्रमशक्तीनें गुणशर्म्याकडून आलेल्या सेवकाला अंधारकोठडींत डांबून टाकलें. नंतर तो आचारी आपल्याकडे येऊन नोकरीस राहिला. विश्वास संपादन करण्यासाठीं तो आचारी प्रथम कांहीं दिवस प्रामाणिकपणें वागला. त्या अवधींत विक्रमशक्तीनें बंदिवासांत डांबून ठवलेला सेवक तेथून

पळाला व गुणशर्म्याकडे येऊन त्यानें सर्व हकीकत त्याला सांगितली. गुणशर्म्याच्या सांगण्याकडून वेष पालटून तोहि स्वयंपाक्यावर बारकाईनें लक्ष ठेवूं लागला. स्वयंपाकी आपल्या जेवणाच्या पदार्थांत विष घालण्याची संधि पहात होता. एके दिवशीं तो आचारी आपल्या जेवणाच्या पदार्थांत विष घालणार असल्याचें त्यानें गुणशर्म्याला कळविलें. त्या दिवशीं गुणशर्मा जेवणाच्या वेळीं येथें थांबला व आचारी विषारी पदार्थ आपणांस वाढीत असतां त्यानें तें ओळखलें. आचाऱ्यानें आपला अपराध कबूल केल्यावर गुणशर्म्यानें त्याला देहान्ताची शिक्षा फर्मावली व अशा रीतीनें त्यानें त्या आचाऱ्यावर सूड उगविला.

आचारी बरेच दिवस आपल्या घरीं गेला नाहीं हें पाहून त्याची आई, बायको व धाकटा भाऊ हीं सर्वजण त्याचा शोध करीत राजधानींत आलीं. त्यांना ओळखून या गुणशर्म्यानें त्या बायांना ठार केलें. मात्र आचाऱ्याचा भाऊ त्याच्या हातावर तुरी देऊन निसटला व सुदैवानें माझ्या महालांत शिरला. अभय मागून त्यानें मला सर्व हकीकत सांगितली. तितक्यांत त्याचा शोध करीत गुणशर्माहि येथेंच आला. गुणशर्म्याला पाहून आचाऱ्याचा तो भाऊ दुसऱ्या दारानें पळाला. मला पाहून गुणशर्मा जागच्या जागींच थबकला. तो बराच गोंधळलेला दिसला. मीं त्याला कांहींसें खडसावल्यानंतर आपलें बिंग बाहेर पडलें हें ओळखून तो माझी क्षमा मागूं लागला. मीं जेव्हां त्याला दाद दिली नाहीं तेव्हां त्यानें माझे पाय धरले. मीं त्याला लाथेनें ठोकरल्यावर मात्र तो चिडला व माझ्याशीं जास्ती लगट करूं लागला. तेव्हां मी ओरडलें. माझें तें ओरडणें ऐकून पल्लविका दासी धांवतच आली. पण तिची चाहूल लागतांच तो दुष्ट येथून पळून गेला. आतां तो संभावितपणें बाहेर मिरवत असेल !"

राणीनें सांगितलेली ही हकीगत ऐकत असतां राजा रागानें नुसता

लाल झाला. त्याचा सारासार विचार लुप्त झाला व गुणशर्म्याला कंठस्नान घालण्याची त्यानें प्रतिज्ञा केली.

राजा दरबारांत येण्यापूर्वीं सर्व मांडलीक व सरदार तेथें येऊन बसले होते. मंत्र्यांच्यापैकीं कांहीं जण सुरुवातीलाच आले होते. थोड्याच वेळांत राजा महासेन आला. त्याचा चेहरा नेहमींप्रमाणें प्रसन्न व आनंदी नव्हता. तो कांहींसा चिडका व रागीट दिसत होता. संथ पावलें टाकीत तो सिंहासनावर जाऊन बसला. त्यानें सभोंवार दृष्टि टाकली. गुणशर्मा त्याच्या दृष्टीस पडला नाहीं. राणीनें सांगितलेल्या कारणामुळेंच गुणशर्मा आला नसावा, असें त्याला वाटलें. त्यानें गुणशर्म्याला लागलीच बोलावून आणण्याचा हुकूम सोडला. तो प्रकार पाहून सगळी सभा आश्चर्यचकित झाली. सभेंतील लोकांत कुजबुज सुरू झाली. राजानें आंठ्या चढवून सगळ्यांच्याकडे पाहिलें, तेव्हां सभेंत पुनः शांतता पसरली.

● ● ●

## गुणशर्म्याचा पडता काळ

इकडे तो दूत राजाच्या आज्ञेवरून गुणशर्म्याकडे आला. गुणशर्मा कांहीं कामासाठीं दुसरीकडे गेला होता. त्यामुळें सभेंत यायला त्याला वेळ लागला. दूत घरीं आला, त्याच वेळीं तोहि बाहेरून आला. राजाचा निरोप ऐकून तो घाईघाईनें निघाला. पण वाटेंत त्याचा डावा बाहु स्फुरण पावूं लागला. त्या दुश्चिन्हाबद्दल विचार करीत तो चालला असतां त्याच्या डाव्या बाजूकडील एका झाडावर कांहीं कावळे मोठमोठ्यानें ओरडत असलेले त्यानें पाहिले. आज कांहींतरी संकट ओढवणार, असा विचार करीत तो पुढें चालला असतां एक कुत्राहि डावीकडून उजवीकडे गेलेला त्याला दिसला. सचिंत मनानें तो अजून थोडा पुढें गेला, तोंच एक साप त्याच्या डावीकडून उजवीकडे सरपटत गेला. एकामागोमाग एक

दिसलेलीं तीं अशुभ चिन्हें पाहून तो आपल्याशींच म्हणाला, " आज कोणतें अरिष्ट कोसळणार आहे देव जाणे! माझ्यावर कोणतेंहि संकट ओढवलें तरी चालेल, पण महाराज महासेनांच्यावर मात्र तें न ओढवो म्हणजे झालें." अशी मनांतल्या मनांत प्रार्थना करीत तो राजसभेंत आला व त्यानें राजाला लवून वंदन केलें आणि तो आपल्या आसनावर जाऊन बसला. राजानें त्याला उलट अभिवादनहि केलें नाहीं हें पाहून दरबारातील लोक चकित झाले. सगळ्यांचे डोळे पुनः राजावर खिळले. गुणशर्म्याला कसलाच बोध होईना. प्रश्नार्थक मुद्रेनें तो सगळीकडे भ्रमिष्टासारखा पहात राहिला.

इतक्यांत राजा स्वतः आसनावरून खालीं उतरला व गुणशर्म्या-जवळ येऊन राजसभेला उद्देशून म्हणाला, " लोक हो! आज मी राजा या नात्यानें तुमच्यापुढें न येतां एक फिर्यादी म्हणून मी उभा आहें. गुणशर्म्यावरच माझे आरोप असल्यामुळें या बाबतींत जबाबदारी तुमच्यावर आहे." तें ऐकून गुणशर्मा तर दिङ्मूढच होऊन गेला. काय बोलावें हेंहि त्याला सुचेना. राजा पुढें बोलण्यापूर्वींच तो राजाला म्हणाला, " महाराज, आज मी हें काय ऐकत आहें? माझ्याकडून कांहीं चूक झाली असेल तर आपण मला तिचा जाब विचारूं शकतां. त्यासाठीं राजसभेकडे न्याय मागायची काय आवश्यकता आहे? माझ्याकडून कांहींहि अपराध झाला असल्याचें आपण मला पटवून दिल्यास मी स्वतः देहान्त प्रायश्चित्त घ्यायला तयार आहें."

गुणशर्म्याचें हें बोलणें राजाला दांभिकपणाचें वाटलें. त्याच्याकडे लक्ष न देतां तो सभेंतील लोकांना म्हणाला, " लोक हो, गुणशर्म्यावर माझा किती लोभ होता हें आपणां सर्वांनाच माहीत आहे. कुलपरंपरेनें आलेल्या इतर मंत्र्यांना बाजूला सारून मीं याला मुख्य मंत्रिपद देऊं केलें. पण या कृतघ्नानें विक्रमशक्तीशीं संधान बांधून मला

विष घालण्याचा कट रचला होता." असें म्हणून अश्वकवर्तीनें सांगितलेली सर्व हकीगत त्यानें राजसभेला ऐकविली. राजाच्या एकेका शब्दाबरोबर गुणशर्म्याच्या मस्तकांत घणाचे घाव बसल्यासारखे होत होतें. राजाचें भाषण संपल्यावर गुणशर्म्याचा उत्कर्ष सहन न होणाऱ्या मंत्र्यांनीं गुणशर्म्याला दोष दिला व 'याच्या राजद्रोहाला देहान्ताशिवाय दुसरी शिक्षा नाहीं' असा एकसुरानें निर्णय दिला. तेव्हां गुणशर्मा राजाला म्हणाला, "महाराज! आपल्या चरणांची शपथ घेऊन सांगतों कीं, असा भयंकर विचार माझ्या स्वप्नांतहि कधीं आला नाहीं. आपणां दोघांतील मैत्री सहन न झाल्यानें कोणी तरी आपले कान फुंकले आहेत. आपल्या कल्याणाशिवाय दुसरा कोणताहि विचार माझ्या मनांत कधीं आला नाहीं. आपला आरोप सिद्ध झाला तर मी स्वतःच्या हातानें आपलें मस्तक उडवीन." गुणशर्म्यानें इतकें सांगूनहि राजाला त्याचें म्हणणें मान्य झालें नाहीं. तो पुढें म्हणाला, "दुष्टा! आतां ही बडबड पुरे कर. तूं त्या कटांत नसतास तर त्याच दिवशीं जेवणाच्या वेळेपर्यंत कसा राहिलास व केवळ भांड्यांतील पदार्थ दुरूनच पाहून त्यांत विष कालविलें आहे हें तुला कसें समजलें? त्या आचाऱ्याला फांशीं देऊन त्याबद्दलचा पुरावाहि तूं नष्ट केलास. नाहीं तर तुझ्याविरुद्ध बोलताचालता पुरावा येथेंच उभा केला असता. आचाऱ्याचा भाऊहि घाबरून पळून गेला. पण माझी खात्री पटली आहे."

राजा अविचारानें कांहींहि आरोप करीत आहे हे पाहून गणशर्मा त्याला कांहींशा निर्भीडपणें व निर्भयपणें म्हणाला, "महाराज! पुराव्या-शिवाय आरोप करणें हें आपणाला शोभत नाहीं. आपल्या हातून अशा तऱ्हेनें अविचारानें कोणतीहि गोष्ट झालेली मला मानवणार नाहीं. आपण मला खुशाल फांशीं द्या. पण मूर्खांच्या नादीं लागून आपली पातळी सोडूं नका." गुणशर्म्याचे हे शब्द ऐकून खवळलेल्या राजाला सारासार विचार राहिला नाहीं. "उद्धट माणसा! भरसभेंत मला

अविचारी म्हणतोस ? ” असें म्हणत तो गुणशर्म्यावर चालून गेला. तेव्हां मात्र प्रसंगावधान राखून गुणशर्म्यानें राजाला हुलकावणी दिली व त्यानें आपल्याजवळील दिव्य अंजनाची बाटली बाहेर काढली. तें डोळ्यांत घालून तो क्षणांत तेथल्या तेथें अदृश्य झाला. पहातां पहातां तो दिसेनासा झालेला पाहून सर्व लोक आश्चर्यचकित झाले. पण राजाला त्याची ही विद्या माहीत असल्यामुळें गुणशर्म्यानें आपल्या हातावर तुरी दिली अशी त्याची खात्री झाली. पुढें काय करावें या विचारानें तो अस्वस्थ झाला. त्यानें लागलीच दरबार बरखास्त केला व सचिंत मुद्रेनें तो आपल्या महालांत परतला.

• • •

## गुणशर्म्याचें दक्षिणेकडे प्रस्थान

यापुढें महासेन राजाच्या राज्यांत रहायचें नाहीं असा निश्चय करून गुणशर्मा दक्षिणेंत यायला निघाला. तें सर्व अश्वकवतीचें कारस्थान असलें पाहिजे, याची त्याला खात्री होती. ज्याच्यासाठीं आपण हाडाचीं काडें केलीं व ज्याला अनेकदां प्राणदान दिलें, तो राजा आपल्या उपकाराची फेड अपकारानें करीत असलेला पाहून, त्याला अत्यंत खेद झाला व त्या बाइलवेड्या राजाबद्दल त्याला कींवहि आली. तो प्रवास करीत करीत एका गांवाजवळ आला. तेथें एका वडाच्या झाडाखालीं एक ब्राह्मण आपल्या शिष्यांना पाठ देत बसला होता. त्याच्याजवळ जाऊन गुणशर्म्यानें त्याला वंदन केलें. त्या ब्राह्मणानें त्याला आशीर्वाद देऊन त्याची चवकशी केली. तेव्हां इतर माहिती सांगून गुणशर्मा म्हणाला, “ महाराज, मी एकूण बारा शाखांचें अध्ययन केलें आहे. ऋग्वेद व सामवेद यांच्या प्रत्येकीं दोन शाखा, यजुर्वेदाच्या सात व अथर्ववेदाची एक अशा त्या बारा शाखा आहेत.” त्याचें तें उत्तर ऐकून त्या ब्राह्मणाला अत्यंत आश्चर्य वाटलें. कारण प्रत्येक ब्राह्मण बहुधा एखाद्या वेदाच्या एखाद्या शाखेचेंच

अध्ययन करतो. तो ब्राह्मण गुणशर्म्याला म्हणाला, " महाराज ! आपण कोणा तरी देवाचा अवतार असलां पाहिजे. कारण सामान्य मानवाला इतक्या शास्त्रा शिकणें कधींहि शक्य नाहीं. तेव्हां आपलें पूर्ण नांव काय, आपला वंश कोणता, आपण कोणाजवळ वेदाध्ययन केलें. इत्यादि सविस्तर माहिती सांगून आम्हांला उपकृत करावें अशी आपणांस विनंति आहे. "

● ● ●

## गुणशर्म्याचा इतिहास

त्यानें आस्थापूर्वक चौकशी केलेली पाहून गुणशर्मा त्याला म्हणाला, " महाराज ! माझ्या जन्माचा इतिहास मोठा आहे. पण आपण अत्यंत आपुलकीनें व आस्थेनें माझी चौकशी केली म्हणून मी सांगतों. " असें म्हणून त्यानें पूर्वीपासूनची आपली हकीगत सांगायला सुरुवात केली. तो म्हणाला : पूर्वी उज्जयिनींत आदित्यशर्मा नांवाचा एक ब्राह्मणपुत्र रहात होता. तो लहान असतांनाच त्याचे वडील दिवंगत झाले व त्याच्या आईनें आपल्या पतीच्या चितेवरच स्वतःला बळी दिलें. आदित्यशर्मा पोरका झाला. त्याच्या मामानें त्याला आपल्या घरीं आणून त्याचा सांभाळ केला. योग्य वेळीं त्याची मुंज करून विद्याभ्यासासाठीं त्याला एका चांगल्या गुरुकुलांत ठेवलें. तीव्र स्मरणशक्तीची देणगी आदित्यशर्म्याला लाभल्यामुळें अगदीं कमी काळांत आणि कमी श्रमांत त्यानें सर्व विद्या आत्मसात् केल्या. त्याला विद्याध्ययनाबरोबरच अनेक व्रतंवैकल्यें व जपजाप्य यांची गोडी लागली. त्याचा बराचसा काळ जप करणें, समाधि लावणें इत्यादि गोष्टींत जाऊं लागला. त्यानें योगशास्त्राचा अभ्यास जोरानें सुरू केला. अशा स्थितींत त्याची एका संन्याश्याशीं ओळख झाली. तो संन्याशी योगविद्येंत निष्णात असल्यामुळें त्याच्या सहवासांत राहून ती विद्या आत्मसात् करावयाची असें आदित्यशर्म्यानें ठरविलें.

● ● ●

## संन्याश्याचा संसार

योगविद्येंतील हा त्याचा नवा गुरु, संन्याशी असला तरी त्याची वासना नष्ट झाली नव्हती. आदित्यशर्म्यासारखा शिष्य मिळाल्यावर त्याच्या मदतीनें एका यक्षिणीला वश करून घेण्याचें त्यानें ठरविलें. गुणशर्म्यावर कांहीं कामगिरी सोंपवून त्यानें यज्ञास सुरुवात केली. त्याचा यज्ञ सुरू असतांना एक दिव्य कन्या आपल्या सखी व दासी यांना बरोबर घेऊन विमानांतून निघाली होती. संन्याश्याच्या मंत्रसामर्थ्यानें तें विमान पुढें जाईचना. शेवटीं त्या दिव्य कन्येनें आपलें विमान खालीं उतरविलें. संन्याश्याचा हेतु तिनें अंतर्ज्ञानानें जाणला. नंतर त्या संन्याश्याजवळ येऊन ती त्याला म्हणाली, " महाराज ! मंत्रसामर्थ्यानें जिला वश करून घेण्यासाठीं आपण हा यज्ञ आरंभिला, तीच मी विद्युन्माला. पण तुमच्या या यज्ञामुळें जें मंत्रसामर्थ्य निर्माण झालें आहे तें मला जिंकण्यास अपुरें आहे.मात्र माझ्या परिवारांतून जी सखी किंवा दासी आपणास हवी असेल ती आपण मिळवूं शकतां." असें म्हणून विद्युन्मालेनें त्या संन्याश्याला आपल्या विमानांत नेलें. त्यानें तिच्या एका मैत्रिणीची निवड केल्यावर तिला घेऊन संन्याशी परत आला व विद्युन्माला पुनः विमानांत बसून आपल्या निवासस्थानाकडे निघून गेली.

• • •

## आदित्यशर्म्याची महत्त्वाकांक्षा

विद्युन्मालेचें सौंदर्य व तेज पाहून आदित्यशर्मा चकित झाला होता. आपणहि मंत्रसामर्थ्यानें विद्युन्मालेपेक्षांहि सुंदर यक्षिणीला वश करून घ्यावयाची असें त्यानें ठरविलें व आपल्या गुरूला लाभलेल्या यक्षिणीला विचारलें, " तुमच्या यक्षभूमींत विद्युन्मालेपेक्षांहि एखादी उत्तम यक्षीण आहे काय ? " तें ऐकून ती यक्षीण म्हणाली, " महापुरुषा ! आम्हां यक्षिणींमध्यें विद्युन्माला, चंद्ररेखा व सुलोचना या तिघी सुंदर

यक्षिणी समजल्या जातात. या तिघींतहि सौंदर्यादि गुणांत व गायनादि कलांत सुलोचनाच सर्वश्रेष्ठ आहे." तें ऐकून सुलोचनेला जिंकण्याच्या निश्चयानें आदित्यशर्मा पुढील बेत रचूं लागला. सुलोचनेला वश करून घेण्याचा मंत्र त्याच्या गुरूलाहि माहीत नव्हता. त्यानें त्याबद्दल त्या यक्षिणीकडेच चौकशी केली तेव्हां ती म्हणाली, "दक्षिणेंत वेणा नदीच्या तीरावर विष्णुगुप्त नांवाचा एक प्रख्यात बुद्धभिक्षु आहे. त्याला तो मंत्र माहीत आहे." तिच्याकडून ही माहिती कळतांच आपल्या गुरूचा निरोप घेऊन आदित्यशर्मा दक्षिणेकडे जायला निघाला. अनेक संकटांना तोंड देत तो भटकत भटकत वेणा नदीच्या तीरावरील तुंबवन नांवाच्या आश्रमांत आला. विष्णुगुप्त आपल्या कांहीं निवडक शिष्यांसह तेथें रहात होता. आदित्यशर्म्यानें लहानपणापासूनची हकीगत सांगून अधिक विद्यासंपादन करण्यासाठीं त्या आश्रमांत रहाण्याची परवानगी मिळविली. मात्र आपल्या येण्याचा खरा हेतु त्यानें कोणालाच कळूं दिला नाहीं. अनेक विद्यांत पारंगत असून योगाभ्यासाची इच्छा असलेला शिष्य आपल्याला लाभला या विचारानें विष्णुगुप्तालाहि आनंद झाला.

आश्रमांत राहून आदित्यशर्मा आपल्या नव्या गुरूची सेवा करूं लागला. अनेक शास्त्रांच्या तत्त्वचर्चेंत गुरुशिष्यांचा बराच काळ जात असे. इतर वेळीं आदित्यशर्मा गुरूची सेवा मनोभावें करीत असे. तीन वर्षें सतत केलेल्या सेवेमुळें विष्णुगुप्त त्याच्यावर प्रसन्न झाला व त्याची इच्छा लक्षांत घेऊन त्यानें आदित्यशर्म्याला सुलोचनेच्या प्राप्तीचा मंत्र दिला.

• • •

## सुलोचनेची प्राप्ति

तो मंत्र मिळतांच आदित्यशर्म्यानें गुरूचा निरोप घेतला व एकान्तांत जाऊन त्या मंत्रानें त्यानें विधिपूर्वक होम केला. तो होम पार

पडल्यावर आपल्या सौंदर्यानें सर्वांना दिपवून टाकणारी सुलोचना तेथें आली व त्याला म्हणाली, " महाराज ! मंत्रसामर्थ्यानें आपण मला येथें खेंचून आणलें आहे. पण मीं घेतलेलें एक व्रत अजून अपुरें आहे. तें सहा महिन्यांनीं पुरें होईल. तोंपर्यंत मला विवाहाचा आग्रह करूं नका. नंतर मात्र मी आपल्याशीं विवाहबद्ध होण्याचें वचन देतें. " तिचे ते शब्द ऐकून आदित्यशर्म्यानें विशेष आढेवेढे न घेतां तिची विनंति मान्य केली. त्याचें तें संयमी व उदार वर्तन पाहून सुलोचनेलाहि अत्यंत आनंद झाला. त्याला विमानांत घेऊन ती अलका नगरीला आली. तेथें त्याच्या हाताखालीं अनेक दास व दासी ठेवून, एका स्वतंत्र महालांत तिनें त्याच्या रहाण्याची व्यवस्था केली व आपण स्वतः व्रतामध्यें गढून गेली.

● ● ●

## गुणशर्म्याचा जन्म

तोहि यक्षनगरींतील अनेक आश्चर्यकारक गोष्टींचा परिचय करून घेत, तेथें सुखानें काळ घालवीत राहिला. सुलोचनेचें व्रत संपल्यावर त्याच्या वर्तनानें संतुष्ट झालेल्या कुबेरानें स्वतः सुलोचनेचा त्याच्याशीं विवाह घडवून आणला. आदित्यशर्मा व सुलोचना यांचा काळ सुखांत जाऊं लागला. सुलोचनेनें केलेल्या व्रतामुळें तिला सर्वज्ञ, सुलक्षणी व महापराक्रमी पुत्र झाला. तोच मी गुणशर्मा. प्रत्यक्ष कुबेरानें माझ्या शिक्षणाची व्यवस्था केली व मणिधर नांवाच्या एका पंडिताकडून मी सर्व वेदविद्या व नृत्यगीतादि कला शिकलों. वडिलांच्याकडून योग-विद्येंतील कांहीं महत्त्वाचा भागहि मीं समजावून घेतला.

● ● ●

## गुणशर्म्याचें मृत्युलोकांत आगमन

माझा काल अलका नगरींत सुखानें चालला असतां मला मृत्यु-लोकांत यावें लागेल, असें कुणाच्या स्वप्नींहि आलें नसेल. पण एक प्रसंग

तसा घडला. कुबेराची सभा भरली असतां इंद्र तेथें अचानक आला. त्याला पाहून सर्व यक्षांनीं उभें राहून त्याला अभिवादन केलें. पण माझ्या वडिलांचें लक्ष त्या वेळीं दुसरीकडे वेधल्यामुळें इंद्र आल्याचें त्यांच्या गांवींहि नव्हतें. ते बसलेले इंद्राला दिसून आले. इंद्राला तो आपला अपमान झाला असें वाटलें व सर्वांदेखत इंद्र रागानें माझ्या वडिलांना म्हणाला, " मूर्खा ! तुला देवलोकींचे आचार विचार कळत नाहींत असें दिसतें. तेव्हां तुला याच क्षणीं मृत्युलोकांत जाण्याची मी आज्ञा करतों. " इंद्राचे हे रागाचे बोल ऐकून वडिलांना फार वाईट वाटलें. माझ्या आईच्या डोळ्यांत तर पाणीच आलें. इंद्राचे पाय धरून ती विनवणीच्या स्वरांत म्हणाली, " देवाधिदेवा ! माझ्या पतिराजांच्या हातून चुकून अपराध घडला. त्यांत आपला अपमान करण्याचा मुळींच हेतु नव्हता हें आपण अन्तर्ज्ञानानेंहि जाणतां. तेव्हां एक वार आपण त्यांना क्षमा करा. त्यांच्यासाठीं मी आपणापुढें पदर पसरतें. एवढी भीक या दासीला घाला. " ती असें म्हणत आहे, तोंच वडिलांनींहि इंद्राचे पाय धरले व क्षमेची याचना केली. तेव्हां इंद्र म्हणाला, " सुलोचने ! तुझ्या-साठीं मी आज या उद्धट माणसाला क्षमा करीत आहें. पण माझे शब्द कधींहि खोटे ठरत नाहींत. हा तुझा पति देवलोकांत रहावा असा तुझा आग्रह असेल, तर गुणशर्म्याला मृत्युलोकांत जावें लागेल. मुलगा हा पित्याचा अंश असल्यानें गुणशर्मा मृत्युलोकांत गेला असतां माझें वचन खरें ठरेल व तुलाहि आपल्या पतीसह येथें सुखानें रहातां येईल." इंद्रानें काढलेला हा पर्याय दोघांनाहि मान्य झाला व त्यांनीं मला भूलोकांत पाठविण्याचें इंद्राजवळ कबूल केलें. नंतर वडिलांनीं मला सर्व हकीगत सांगितली व त्यांच्यासाठीं मी यक्षभूमींतील सुखाचा त्याग करायला सिद्ध झालों. नंतर वडिलांनीं मला विमानांतून उज्जयिनीच्या उपवनांत आणून सोडलें. त्या नगरींत मी कांहीं दिवस काढले असतां. विविध कलांतील व विद्यांतील

पडल्यावर आपल्या सौंदर्यानें सर्वांना दिपवून टाकणारी सुलोचना तेथें आली व त्याला म्हणाली, " महाराज ! मंत्रसामर्थ्यानें आपण मला येथें खेंचून आणलें आहे. पण मीं घेतलेलें एक व्रत अजून अपुरें आहे. तें सहा महिन्यांनीं पुरें होईल. तोंपर्यंत मला विवाहाचा आग्रह करूं नका. नंतर मात्र मी आपल्याशीं विवाहबद्ध होण्याचें वचन देतें." तिचे ते शब्द ऐकून आदित्यशर्म्यानें विशेष आढेवेढे न घेतां तिची विनंति मान्य केली. त्याचें तें संयमी व उदार वर्तन पाहून सुलोचनेलाहि अत्यंत आनंद झाला. त्याला विमानांत घेऊन ती अलका नगरीला आली. तेथें त्याच्या हाताखालीं अनेक दास व दासी ठेवून, एका स्वतंत्र महालांत तिनें त्याच्या रहाण्याची व्यवस्था केली व आपण स्वतः व्रतामध्यें गढून गेली.

● ● ●

## गुणशर्म्याचा जन्म

तोहि यक्षनगरींतील अनेक आश्चर्यकारक गोष्टींचा परिचय करून घेत, तेथें सुखानें काळ घालवीत राहिला. सुलोचनेचें व्रत संपल्यावर त्याच्या वर्तनानें संतुष्ट झालेल्या कुबेरानें स्वतः सुलोचनेचा त्याच्याशीं विवाह घडवून आणला. आदित्यशर्मा व सुलोचना यांचा काळ सुखांत जाऊं लागला. सुलोचनेनें केलेल्या व्रतामुळें तिला सर्वज्ञ, सुलक्षणी व महापराक्रमी पुत्र झाला. तोच मी गुणशर्मा. प्रत्यक्ष कुबेरानें माझ्या शिक्षणाची व्यवस्था केली व मणिधर नांवाच्या एका पंडिताकडून मी सर्व वेदविद्या व नृत्यगीतादि कला शिकलों. वडिलांच्याकडून योग-विद्येंतील कांहीं महत्त्वाचा भागहि मीं समजावून घेतला.

● ● ●

## गुणशर्म्याचें मृत्युलोकांत आगमन

माझा काल अलका नगरींत सुखानें चालला असतां मला मृत्यु-लोकांत यावें लागेल, असें कुणाच्या स्वप्नींहि आलें नसेल. पण एक प्रसंग

तसा घडला. कुबेराची सभा भरली असतां इंद्र तेथें अचानक आला. त्याला पाहून सर्व यक्षांनीं उभें राहून त्याला अभिवादन केलें. पण माझ्या वडिलांचें लक्ष त्या वेळीं दुसरीकडे वेधल्यामुळें इंद्र आल्याचें त्यांच्या गांवींहि नव्हतें. ते बसलेले इंद्राला दिसून आले. इंद्राला तो आपला अपमान झाला असें वाटलें व सर्वांदेखत इंद्र रागानें माझ्या वडिलांना म्हणाला, " मूर्खा ! तुला देवलोकींचे आचार विचार कळत नाहींत असें दिसतें. तेव्हां तुला याच क्षणीं मृत्युलोकांत जाण्याची मी आज्ञा करतों. " इंद्राचे हे रागाचे बोल ऐकून वडिलांना फार वाईट वाटलें. माझ्या आईच्या डोळ्यांत तर पाणीच आलें. इंद्राचे पाय धरून ती विनवणीच्या स्वरांत म्हणाली, " देवाधिदेवा ! माझ्या पतिराजांच्या हातून चुकून अपराध घडला. त्यांत आपला अपमान करण्याचा मुळींच हेतु नव्हता हें आपण अन्तर्ज्ञानानेंहि जाणतां. तेव्हां एक वार आपण त्यांना क्षमा करा. त्यांच्यासाठीं मी आपणापुढें पदर पसरतें. एवढी भीक या दासीला घाला. " ती असें म्हणत आहे, तोंच वडिलांनींहि इंद्राचे पाय धरले व क्षमेची याचना केली. तेव्हां इंद्र म्हणाला, " सुलोचने ! तुझ्या-साठीं मी आज या उद्धट माणसाला क्षमा करीत आहें. पण माझे शब्द कधींहि खोटे ठरत नाहींत. हा तुझा पति देवलोकांत रहावा असा तुझा आग्रह असेल, तर गुणशर्म्याला मृत्युलोकांत जावें लागेल. मुलगा हा पित्याचा अंश असल्यानें गुणशर्मा मृत्युलोकांत गेला असतां माझें वचन खरें ठरेल व तुलाहि आपल्या पतीसह येथें सुखानें रहातां येईल." इंद्रानें काढलेला हा पर्याय दोघांनाहि मान्य झाला व त्यांनीं मला भूलोकांत पाठविण्याचें इंद्राजवळ कबूल केलें. नंतर वडिलांनीं मला सर्व हकीगत सांगितली व त्यांच्यासाठीं मी यक्षभूमींतील सुखाचा त्याग करायला सिद्ध झालों. नंतर वडिलांनीं मला विमानांतून उज्जयिनीच्या उपवनांत आणून सोडलें. त्या नगरींत मी कांहीं दिवस काढले असतां, विविध कलांतील व विद्यांतील

माझ्या नैपुण्याची कीर्ति राजाच्या कानीं गेली. राजानें मला बोलावून घेतलें व आपल्या दरबारांत मानाचें स्थान दिलें. माझ्या नैपुण्याची परीक्षा घेतल्यावर पुढें त्यानें मला आपला महामंत्रीच केलें. पण आपल्या दुष्ट पत्नीच्या नादीं लागून त्यानें मला नष्ट करण्याचा विचार केला, म्हणून मी निसटून इकडे आलों. असें म्हणून त्यानें तेथें घडलेली सर्व हकीगत त्या अग्निदत्त ब्राह्मणाला थोडक्यांत सांगितली.

• • •

## 'सुंदरी'चा स्वीकार करण्याची विनंति

आईवडिलांच्यासाठीं स्वर्गसुखावर लाथ मारणाऱ्या व आपल्या पांडित्यानें सर्वांना दिपवून टाकणाऱ्या गुणशर्म्याला पाहून अग्निदत्ताला त्याच्याबद्दल आदर वाटूं लागला. तो गुणशर्म्याला म्हणाला, " महाभाग ! आपल्या दर्शनानें मी धन्य झालों आहें. हें गांव मला दान मिळालें असल्यानें येथें माझीच सत्ता आहे. तरी आपण माझ्याकडे कसलाहि संकोच न करतां रहा." गुणशर्मा प्रवासानें दमून गेला होता. तो एखाद दुसरा दिवस त्याच्याकडे रहाण्यास तयार झाला. पण अग्निदत्तानें त्याला आणखी कांहीं दिवस रहाण्याचा आग्रह केला. त्याची त्यानें उत्तम बडदास्त ठेविली. अग्निदत्तानें स्वतः त्याच्या आवडी निवडी लक्षांत घेऊन, त्याला कशाचीहि उणीव भासूं दिली नाहीं. अग्निदत्ताला अत्यंत रूपवती व सुलक्षणी अशी 'सुंदरी' नांवाची एकुलती एक मुलगी होती. त्यानें गुणशर्म्याला तिची ओळख करून दिली. तिच्या नाकावर असलेला तीळ पाहून, ती आंत गेली असतां, गुणशर्मा अग्निदत्ताला म्हणाला, " ब्रह्मन् ! आपल्या मुलीच्या नाकावर तीळ आहे त्यावरून तिला लग्नानंतर सवती येण्याची बरीच शक्यता दिसते. शिवाय तिच्या इतर गुणांवरून तिच्या दंडावरहि तीळ असला पाहिजे." अग्निदत्तानें तिच्या लहानपणींच तिच्या दंडावरील तीळ अनेकदां पाहिला होता. आतां तो प्रत्यक्ष दिसत नसतांहि, तो

असला पाहिजे, असें गुणशर्मा निश्चयपूर्वक सांगत असलेलें पाहून अग्निदत्ताला त्याच्या सर्वज्ञतेची खात्री पटली. पण मुलीला सवती असणार या कल्पनेनें त्याला थोडें वाईट वाटलेंसें दिसलें. तेव्हां त्याची खिन्नता दूर करण्यासाठीं गुणशर्मा म्हणाला, "माझ्या बोलण्यानें आपल्याला वाईट वाटलें का ? पण आपण मुळींच कष्टी होऊं नका. तिचा पति खूप श्रीमंत असेल. ती कदाचित् पट्टराणी होण्याचीहि शक्यता तिच्या इतर लक्षणांवरून दिसते." अग्निदत्त व गुणशर्मा यांचें संभाषण सुंदरी आंतून ऐकत होती. गुणशर्म्याला पाहिल्यापासून तिचें मन त्याच्यावर जडलें होतें. तो आपला पति झाला तर त्रैलोक्याच्या राज्यावरहि लाथ मारायला ती तयार होती. तिचें घरकामांत मुळींच लक्ष लागेना. तिच्या मनांत सारखा कसला तरी विचार येत होता. तिच्या आईनें तिची अस्वस्थता ओळखली व तिच्या मनांतील विचार खुबीनें काढून घेतला. तिनें आपल्या पतीला त्याची कल्पना दिली. अग्निदत्ताच्या मनांतहि तोच विचार येत होता. त्यानें गुणशर्म्याजवळ शेवटीं तो विषय काढला. तो म्हणाला, "महाभाग ! माझ्या मुलीचा आपणाशीं परिचय झालाच आहे. तिचा स्वीकार करून आपण मला कायमचें ऋणी करा व येथेंच कायमचें सुखासमाधानानें रहा." त्यावर गुणशर्मा म्हणाला, "सुंदरीचा स्वीकार करण्यांत मला अभिमानच वाटेल. पण महासेनानें केलेल्या माझ्या अपमानाचा सूड उगविल्याशिवाय मला खरें समाधान लाभणार नाहीं. शिवाय उज्जयिनी येथून जवळच असल्यानें येथें रहाणें मला धोक्याचेंच आहे. तेव्हां माझ्या अपमानाबद्दल राजाला प्रायश्चित्त देऊन, या जन्मींचीं पापें धुऊन काढण्यासाठीं तीर्थाटन करायचें असें मीं ठरविलें आहे." त्याचें तें म्हणणें ऐकून अग्निदत्त त्याला म्हणाला, "महाभाग ! आपल्या अविचारी कृत्यांनींच राजा महासेन आपला मृत्यु ओढवून घेत आहे. त्यासाठीं आपण स्वतंत्र कष्ट घेण्याची आवश्यकता नाहीं. उज्जयिनी

जवळ असली तरी आपल्याला त्या भीतीचें कारण उरणार नाहीं अशी मी आपली व्यवस्था करतों. शिवाय तीर्थाटन करून आपण जें पुण्य मिळविणार तेंच आपण येथें राहून देवतेच्या उपासनेनें मिळवूं शकाल. तरी आपण येथें सुंदरीसह निश्चिंत रहा."

● ● ●

## गुणशर्म्याची अट

गुणशर्म्याला अग्निदत्ताची विनंति अमान्य करणें अशक्य झालें. शेवटीं एका अटीवर त्यानें अग्निदत्ताची विनंति मान्य केली. तो म्हणाला, "मी सुंदरीशीं विवाह करायला तयार आहें. पण त्यापूर्वी महासेन राजावर सूड उगविण्याची माझी प्रतिज्ञा पार पडली पाहिजे. त्या दृष्टीनें मी आपल्या सांगण्याप्रमाणें येथेंच गुप्तपणें इष्टदेवतेची उपासना करून, त्या कृतघ्न राजाचें पारिपत्य करण्यासाठीं सामर्थ्य संपादन करीन व माझी प्रतिज्ञा पूर्ण झाल्यावर आपल्या मुलीशीं विवाह करीन. तेव्हां या बाबतींत आपण मला मदत करा." हें ऐकून अग्निदत्ताला आनंद झाला. त्यानें आपल्या घरचें भुयार झाडून, सारवून स्वच्छ करवून घेतलें. त्या भुयारांतच एका बाजूला एक मोठें तळघर होतें. त्या गांवांतील लोकांनाहि त्याची माहिती नव्हती. तेथें तळघर असेल अशी कल्पना बाहेरून कोणालाहि आली नसती. अग्निदत्तानें गुणशर्म्याची रहाण्याची व्यवस्था त्या तळघरांत केली व गुणशर्म्याला कार्तिकेयाचा एक मंत्र दिला आणि त्याची उपासना करण्यास सांगितलें.

● ● ●

## कार्तिकेयाची आराधना

त्या तळघरांत कार्तिकेयाच्या मूर्तीपुढें त्या मंत्राचा जप करीत गुणशर्मा इष्टसिद्धीसाठीं तपश्चर्या करूं लागला. निराहार राहून अनेक दिवस चोवीस चोवीस तास सतत जप केल्यानें कार्तिकेयानें त्याला

प्रसन्न होऊन दर्शन दिलें व तो म्हणाला, "वत्सा! लवकरच तुला खूप मोठें वैभव प्राप्त होईल. त्याच्या जोरावर तूं महासेनास जिंकशील व पुढें तुला सर्व पृथ्वीचें राज्य मिळेल." असें बोलून कार्तिकेय अदृश्य झाला. तेव्हां ती बातमी गुणशर्म्यानें अग्निदत्ताला सांगितली. सर्वांनाच अत्यानंद झाला. त्याच दिवशीं रात्रीं त्याला एक स्वप्न पडलें व त्यांत त्याला जमिनींत रत्नांचे हंडे पुरलेले दिसलें. तो जागा झाल्यावर त्याला तें स्वप्न आठवलें. त्या स्वप्नावर विश्वास ठेवून त्यानें तळघरांतील जमीन खूप खोल खणून पाहिली. तोंच एका बाजूस हिऱ्यामाणकांनीं भरलेले सोन्याचे पांच हंडे त्याला मिळाले. कार्तिकेयाचें वचन खरें झालेलें पाहून त्याला अत्यंत आनंद झाला. पण तें तळघरहि गुणशर्म्याच्याच मालकीचें असल्यामुळें त्या सर्व वैभवाचा स्वामी तोच असें मानून ते सोन्याचे पांचहि हंडे त्यानें अग्निदत्ताला देऊं केले. अग्निदत्तानेंहि 'गुणशर्म्यानें केलेल्या कार्तिकेयाच्या तपश्चर्येचें तें फळ आहे' असें मानून ते सर्व हंडे गुणशर्म्याच्याच हवालीं केले. त्याची ती निःस्पृहता पाहून गुणशर्म्याला आश्चर्य वाटलें. अग्निदत्ताच्या आग्रहावरून गुणशर्म्यानें ते आपल्या ताब्यांत घेतले.

गुणशर्मा आतां मोठ्या संपत्तीचा मालक झाला. आपल्या संपत्तींतून त्यानें कांहीं सैन्य उभारलें. अग्निदत्तानेंहि त्याला या बाबतींत बरीच मदत केली. महासेनाच्या दरबारीं अनेक राजे व सरदार गुणशर्म्याचे मित्र बनले होते. ते महासेनाच्या अनिर्बंध जुलमाला कंटाळून गेले होते. गुणशर्म्यानें त्यांच्याकडे आपले हेर पाठविले व त्यांना आपल्या बाजूला वळवून घेतलें. महासेनाच्या सैन्यांतहि त्यानें फूट पाडून ठेवली.

● ● ●

### महासेन राजावर स्वारी व राज्यप्राप्ति

संधि साधून आपल्या छोट्या सैन्यानिशीं तो उज्जयिनीवर चालून

गेला. महासेन राजाला याची कांहींच कल्पना नव्हती. त्यानें आपल्या सेनापतीला त्याचा प्रतिकार करण्याची आज्ञा दिली. सैन्याची जमवाजमव करून महासेनाचा सेनापति त्याच्यावर चालून गेला खरा, पण त्याच्या सैन्यांतील बऱ्याच तुकड्या गुणशर्म्याला येऊन मिळाल्या. सहाजिकच त्याला हार खावी लागली. नंतर गुणशर्मा आपल्या प्रचंड सैन्यासह उज्जयिनीकडे निघाला. त्याला वाटेंत कोणीहि प्रतिकार केला नाहीं. राजधानींतील लोकांनीं तर त्याचें मोठ्या उत्साहानें स्वागत केलें. त्यानें आपल्या सेनापतीकडून महासेनास अटक केली. राणी अश्वकवतीलाहि त्याच्या सेनापतीनें कैद केलें. 'गुणशर्मा आपल्याला देहान्ताची शिक्षा दिल्याशिवाय रहाणार नाहीं' अशी तिची खात्री झाल्यानें, तिनें आपला अपराध कबूल करून त्याच्याकडे क्षमेची याचना केली. तेव्हां मात्र महासेन राजाचे डोळे उघडले. पण आतां कांहीं उपयोग नव्हता. गुणशर्म्यानें त्या दोघांनाहि हद्दपार केलें व तो स्वतः उज्जयिनीचा राजा बनला.

आपल्याला राज्याभिषेक करून घेण्यापूर्वी त्यानें सुंदरीशीं विधिपूर्वक विवाह केला व इतर अनेक राजांशींहि सोयरिक जोडली. अशा रीतीनें युद्ध न करतां अनेक राजांना त्यानें आपलेंसें केलें. राज्याभिषेकाच्या वेळीं त्यानें सुंदरीला आपली पट्टराणी केली व प्रजेच्या कल्याणाकडे लक्ष देऊन व विद्वानांचा योग्य सन्मान करून आदर्श राजा म्हणून जगांत कीर्ति मिळविली.

IRBK-0106288
IRBK-0106288